# स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था

गेट क्र. ८, मुर्तीजापूर रोड, जुन्या नाक्याजवळ, कृषिनगर, अकोला-४४४१०४

**(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर)**

डॉ. एच. एस. बिराडे
एमव्हीएससी, पी.एचडी.
सहयोगी अधिष्ठाता

☎ : 0724 -2258643
फक्स : 0724 -2258644
ईमेल : adpgivas@rediffmail.com


## दरपत्रके मागविण्याची सूचना

विषय :आत्माअंतर्गत पशुसंगोपन व दुग्धव्यवसाय या विषयावर आयोजित करावयाच्या प्रशिक्षणा दरम्यान शेतकऱ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी दरपत्रके मागविणेबाबत

उपरोक्त विषयी स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था (स्नापपविसं), अकोला येथील पशुधन उत्पादन व व्यवस्थापन (एलपीएम) विभाग अंतर्गत माहे मार्च २०१९ मध्ये' पशुसंगोपन व दुग्धव्यवसाय 'या विषयावर शेतकऱ्यांकरीता लघुकालावधीची) पाच दिवसीय (एकूण दोन प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावयाची आहेत .प्रत्येक शिबिरात पंचवीस (२५) प्रशिक्षणार्थी उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षणा दरम्यान शेतकऱ्यांची राहण्याची (निवास) व्यवस्था करावयाची आहे. तरी, या क्षेत्रातील इच्छुक प्रतिष्ठानांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती:

1. निवास व्यवस्था ही एका प्रशिक्षणादरम्यान एकूण पाच दिवस व चार रात्री करीता करावी लागेल.
2. दरपत्रकात चेक आऊट (असल्यास) वेळ नमूद करावी. शेतकरी हे साधारणपणे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी सकाळी येतील व शेवटच्या दिवशी सायंकाळी सहा वाजल्यानंतर निवास व्यवस्था सोडतील.
3. दरपत्रकातील अक्षर, आकडे हे सुवाच्य असावेत.
4. दरपत्रकात नमूद दर हे उपरोक्त नमूद दोन्ही प्रशिक्षण शिबिरांकरीता कायम राहतील.
5. दरपत्रक / दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहतील.
6. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत '**दरपत्रक - एलपीएम विभाग - शेतकरी प्रशिक्षण - निवास व्यवस्था**' असे लिहावे.
7. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.
8. मोहोरबंद दरपत्रके मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था (स्नापपविसं), अकोला-४ या पत्यावर दिनांक ०६ मार्च २०१९ च्या सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

28/02/2019

**सहयोगी अधिष्ठाता**
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था,
अकोला-४४४१०४

जावक क्र. सह.अधि./स्ना.प.प.वि. संस्था/ 425
सहयोगी अधिष्ठाता यांचे कार्यालय,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला
दि. 28/02/2019